प्रकरण - सहा

# निष्कर्ष व शिफारशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

# प्र क र ण – सहा

## निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना

६.२ विद्यार्थी दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिका वापरा विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.३ अध्यापक दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिका वापरा विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.४ पालक दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शिका वापरा विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.५ परीक्षा पध्दती व मार्गदर्शिका वापरा विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.६ पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.७ मार्गदर्शिका पाठ्यपुस्तक विषयक निष्कर्ष व शिफारशी.

६.८ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी.

६.९ पुढील संशोधनासाठी काही विषय.

=-=-=-=-=-=

## प्र क र ण – सहा

## निष्कर्ष व शिफारशी

६.१ प्रस्तावना :-

मागील प्रकरणात [प्रकरण- पाच संकलित माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण] विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली व पालक प्रश्नावलीव्दारे प्राप्त झालेल्या प्रस्तुत संशोधन विषयक सामुग्रीचे विश्लेषण, वर्गीकरण करुन अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात त्यावर आधारित निष्कर्ष व शिफारशी सादर केल्या आहेत. तसेच पुढील संशोधनासाठी काही विषय सुचविण्यांत आलेले आहेत.

६.२ विद्यार्थी दृष्टीकोनातुन पाठयपुस्तक व मार्गदर्शक वापरा विषयक निष्कर्ष व शिफारशी :-

माध्यमिक स्तरावरील इयत्ता दहावीच्या इतिहास पाठयपुस्तक व मार्गदर्शक यांच्या अध्ययनातील वापरा विषयक विद्यार्थी प्रश्नावली-व्दारा संकलित झालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्यातील महत्वाचे निष्कर्ष सारांश-रुपाने येथे दिले असून त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

पृष्ठांक [ ७१ ] वरील सारणी क्रमांक ५.१ [पाठयपुस्तक व मार्गदर्शक या संबंधीची उपयुक्त माहिती] वरुन असा निष्कर्ष निघतो की –

[१] पाठयपुस्तका बरोबर मार्गदर्शिका विकत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९५ टक्के इतकी आहे.

[२] "अभ्यासासाठी मार्गदर्शक वापरा" अशी सूचना शिक्षक देतात असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ८५ टक्के इतकी आहे.

[३] अभ्यासाला मार्गदर्शक वापरण्या विषयी पालक प्रोत्साहन देतात असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७२ टक्के इतकी आहे.

अध्ययनात पाठ्यपुस्तकापेक्षा मार्गदर्शकाचाच वापर अधिक होतो आहे, या वापराला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शिक्षक आणि पालकच हातभार लावत असल्याचे वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते. अध्यापक व पालक यांच्या भूमिकेशी ही गोष्ट विसंगत असून चिंतेची आहे. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, "दहावी पास व्हावे" याच भूमिकेतून मार्गदर्शक वापरण्यास प्रोत्साहन देणाऱ्या पालकांनी पाठ्यपुस्तकातून अध्ययन केल्याने जे स्वयंअध्ययन होते ते चिरस्थायी स्वरुपाचे असते हे पाल्यांना पटवून द्यावे व पाठ्यपुस्तकातून अध्ययन करण्याची सवय लावावी. अध्यापकांनी मार्गदर्शक अध्ययनाला उपयुक्त असल्याचे सूचीत करु नये. अध्यापकानीच जर पाठ्यपुस्तकाचे महत्व कमी केले तर विद्यार्थ्यांना दोष देण्यात अर्थ नाही. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, अध्यापकांनी पाठ्यपुस्तकच अध्ययनाला कसे, किती उपयुक्त आहे याची वर्गात चर्चा करावी. पाठ्यपुस्तकातील उत्तराला प्राधान्य देवून मुलांना पाठ्यपुस्तकातून अभ्यास करण्याची नियोजनपूर्वक सवय लावावी.

अध्ययनाला पाठ्यपुस्तक उपयुक्त आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३५ टक्के इतकी आहे. पाठ्यपुस्तक अध्ययनाला उपयुक्त असल्याची जी कारणे विद्यार्थ्यांनी दिली आहेत त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की,

[१] पाठ्यपुस्तकाच्या आधारेच मुद्देसूद उत्तरे लिहीता येतात.

[२] सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करता येतो.

[३] स्वतःच्या भाषेत उत्तरे लिहीता येतात.

[४] पाठ्यपुस्तकातून अभ्यास केल्याने विचार करण्याची क्षमता वाढते.

[५] पाठ्यपुस्तकाने अचूक घटनाक्रम समजतो.

[६] माध्यमिक शालांत परीक्षेची प्रश्नपत्रिका पाठ्यपुस्तकावरच असते.

अध्ययनाला इतिहास पाठ्यपुस्तक उपयुक्त आहे याच्या स्पष्टीकरणार्थ विद्यार्थ्यांनी दिलेल्या वरील कारणावरुन अशी शिफारस करावीशी वाटते की, इतिहास पाठ्यपुस्तकाचे अभ्यासासाठीचे महत्व पटवून देणारे महत्वपूर्ण वरील मुद्दे शिक्षकांनी वर्गात विद्यार्थ्यांना विस्तृतपणे सोदाहरण समजावून द्यावेत व विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकच अध्ययनाला वापरावे अशी त्यांची मनोभूमिका तयार करावी.

अध्ययनाला मार्गदर्शक पाठ्यपुस्तकापेक्षा जास्त उपयुक्त असल्याची कबुली देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६५ टक्के इतकी आहे. त्यासाठी त्यांनी दिलेल्या कारणावरून असा निष्कर्ष निघतो की, मार्गदर्शकात प्रश्नांची उत्तरे मुद्देसूद असतात, मार्गदर्शकाची भाषा सोपी असते, मार्गदर्शकावरून प्रश्नपत्रिकेचे स्वरूप कळते, परीक्षेतील घटकानुसार व प्रश्न प्रकारानुसार गुण विभागणी मार्गदर्शकात दिलेली असते.

वरील निष्कर्षानुसार अशी शिफारस करावीशी वाटते की, इतिहास विषय शिक्षकांनी वर्गात मुद्देसूद उत्तरे कशी लिहावीत याचा भरपूर सराव द्यावा, परीक्षेत येणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रश्नांचे स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून सांगावे आणि भरपूर स्वाध्यायाचा सराव द्यावा, आपले अध्यापन सोप्या भाषेत करून घटना, प्रसंग, कारणे, परिणाम विद्यार्थ्यांच्या मनात ठसविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा, परीक्षेत येणाऱ्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप तिचा आराखडा, घटकानुसार गुणविभागणी,

प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी याविषयक सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना प्रारंभापासूनच सतत द्यावी.

६.३ अध्यापक दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक वापरा विषयक - निष्कर्ष व शिफारशी :-

माध्यमिक स्तरावरील इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या अध्यापनासाठी वापरा विषयक अध्यापक प्रश्नावली-द्वारा संकलित झालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात, त्यातील महत्वाचे निष्कर्ष सारांश-रुपाने येथे दिले असून त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

पृष्ठांक [ ८७ ] वरील सारणी क्रमांक ५.३ [ इतिहास अध्यापकांचा अध्यापनानुभव ] वरुन असा निष्कर्ष निघतो की, इयत्ता दहावीला इतिहास विषय शिकविण्याचा अनुभव हा ५ वर्षापासून ३१ वर्षे इतका आहे. या अनुभवाचे मध्यमान २१.२० इतके आहे असे दिसून येते. हा अनुभव चांगलाच दीर्घ आहे. त्यांच्या या प्रदीर्घ अनुभवावरुन अध्यापक प्रश्नावलीला प्रतिसाद देताना त्यांनी व्यक्त केलेली मते त्यामुळे साहजिकच यथार्थ, विश्वसनीय व ग्राह्य मानावयास पाहिजेत.

सारणी क्रमांक ५.४ [इतिहास विषय शिकविणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता ] वरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या सर्व इतिहास विषय शिक्षकांची माध्यमिक शाळेत नेमणूक करण्यासाठी व इयत्ता दहावीला इतिहास विषय शिकविण्यासाठीची आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे. त्यांच्या पदवी/पदव्युत्तर परीक्षेला आणि बी.एड्.च्या अध्यापन पध्दतीला इतिहास विषय कोठेना कोठे आहे. ही समाधानाची बाब आहे. पदव्युत्तर नसलेले ६ अध्यापक आहेत.

त्यांनी सुध्दा इतिहास विषयात पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे-अशी शिफारस करावीशी वाटते. त्यामुळे त्यांच्या विषयज्ञानात भर पडेल.

सारणी क्रमांक ५.६ [इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर] वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहास पाठ्यपुस्तकाचा स्तर विद्यार्थ्यांचे वय, त्यांच्या गरजा, आकलनशक्ती यांचा विचार करता मध्यम आहे असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ६०.६० टक्के इतकी आहे. यावरून "समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांचा वयोगट त्यांची आकलनशक्ती लक्षात घेऊन इयत्ता दहावीचे इतिहास पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे" या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यास संशोधन मंडळाच्या म्हणण्यात तथ्य आहे. असा निष्कर्ष निघतो. तरीही अशी शिफारस करावीशी वाटते की, दहावी इतिहास पाठ्यपुस्तकाचा काठीण्यपातळीचा स्तर अजूनही सोपा करण्याचा प्रयत्न व्हावा (म्हणजे सर्वसामान्य विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातून अभ्यास करतांना कोणतीच अडचण येणार नाही.

सारणी क्रमांक ५.७ [इतिहास अध्यापनाचा नवा दृष्टीकोन आणि इतिहास पाठ्यपुस्तकाच्या लेखनाबाबतचे मत] वरून असा निष्कर्ष निघतो की, इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून झाले आहे असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ८६.८७ टक्के इतकी आहे. तर इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून झाले नाही असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या १३.३३ टक्के इतकी आहे. इतिहास अध्यापनाचा अधिक अनुभव असणाऱ्या अध्यापकांनी इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून झाल्याचे म्हटले आहे, तर इतिहास अध्यापनाचा तुलनेने कमी अनुभव असणाऱ्या अध्यापकांनी इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन इतिहास अध्यापनाच्या नव्या दृष्टीकोनातून झाले नसल्याचे म्हटले आहे.

इयत्ता दहावीच्या इतिहास विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांनी अध्यापनासाठी पाठ्यपुस्तकाचा वापर करतो, पण प्रत्यक्ष वर्गात पाठ्यपुस्तकांत बघून अध्यापन करत नाही अशी कबुली दिली आहे. ही फारच समाधानाची बाब आहे.. इतिहास पाठ्यपुस्तकाचा वापर करण्यामागे त्यांची जी भूमिका आहे त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की -

[१] पाठाची तयारी करण्यासाठी.

[२] घटना व मुद्दे योग्य क्रमाने विशद करण्यासाठी.

[३] घटकांचे सविस्तर ज्ञान होण्यासाठी.

[४] अध्यापनात अचूकता येण्यासाठी.

[५] अध्यापनात कोणताही मुद्दा राहू नये यासाठी.

इतिहासाचे अध्यापन प्रभावी व्हावे यासाठी पाठ्यपुस्तकाचा वापर ज्या मुद्यांना धरुन अध्यापनापूर्वी केला जातो ते सर्व मुद्दे अध्यापक जाणून आहेत. ही समाधानाची बाब आहे. तरीही अशी शिफारस करावीशी वाटते की, "केवळ पाठाची तयारी" म्हणून पाठ्यपुस्तकाकडे न पाहता चिंतन, मनन, व्यासंग आणि चिकित्सक दृष्टीकोन या भूमिकेतून इतिहास पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करावा. इतिहास अध्यापकाला इतिहासाचे पाठ्यपुस्तक साकल्याने ज्ञात असावे. केवळ तासाला घ्यावयाचा घटक, उपघटक एवढ्या पुरता मर्यादित पाठ्यपुस्तकाचा उपयोग करु नये.

सारणी क्रमांक ५.८ [अध्यापनात मार्गदर्शिकाचा वापर] वरुन असा निष्कर्ष निघतो की, अध्यापनात पाठ्यपुस्तकाबरोबर मार्गदर्शिकाचा वापर करतो म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या २० टक्के इतकी आहे. तर अध्यापनात पाठ्यपुस्तकाबरोबर मार्गदर्शिकाचा वापर करत नाही असे

म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ८० टक्के इतकी आहे. ही बाब समाधानाची आहे. तरीही २० टक्के अध्यापक अध्यापनात मार्गदर्शकाचा वापर करतात ही गोष्ट मात्र असमाधानाची आहे. अध्यापनात मार्गदर्शकाचा वापर करण्यामागे या अध्यापकांनी जी कारण मीमांसा दिली आहे. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की -

[१] सर्वसामान्य विद्यार्थ्यांची प्रगती साधण्यासाठी.

[२] अभ्यासक्रमाची उजळणी करण्यासाठी.

[३] शेवटच्या महिन्यात प्रश्नोत्तराची उजळणी करण्यासाठी.

मार्गदर्शक वापरण्यामागील वरील कारणांचा विचार करता विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठीच हा वापर आहे हे समजून येते. पण यातूनच विद्यार्थ्याला एक वाईट सवय लावण्याला आपण मदत करत आहोत याचे याचे भान अध्यापकांनी ठेवले पाहीजे. अध्यापक मार्गदर्शिका हातात घेऊन अध्यापन करतात हे विद्यार्थ्यांना समजून आले की अध्यापकांच्या ज्ञानाविषयी, कुवतीविषयी विद्यार्थी साशंक बनतो. "तासालाच बसा कशाला ? "मार्गदर्शकातून शिक्षक शिकवतात" हा समज विद्यार्थ्यांचा पक्का होतो. त्यामुळे मुलें तासाला अवधान देत नाहीत, तासात रमत नाहीत. या सर्वांचा परिणाम म्हणून "इतिहास शिक्षक" ही आपली प्रतिमा त्यांच्यापुढे निस्तेज बनते. म्हणून अशी शिफारस करावीशी वाटते की, अध्यापनात मार्गदर्शकाचा वापर अध्यापकांनी कटाक्षाने टाळावा. व्यासंग, मार्गदर्शन आणि शंकेचे निरसन यासाठी त्याने मार्गदर्शकाची मदत परिणामकारक अध्यापनासाठी जरुर घ्यावी. पण त्याचे जाहीर प्रदर्शन मुलांत करून मार्गदर्शक वापरण्यास प्रोत्साहन देऊ नये. पाठ्यपुस्तकच अध्यापन अध्ययनाचे साधन आहे हे मुलांना पटवून द्यावे.

६.४ पालक दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक वापरा विषयक – निष्कर्ष व शिफारशी :-

माध्यमिक स्तरावरील इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तक व मार्गदर्शक यांच्या अध्ययनातील वापरा विषयक पालक प्रश्नावलीव्दारा संकलित झालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण करुन अन्वयार्थ लावल्यानंतर जे निष्कर्ष निघतात त्यातील महत्वाचे निष्कर्ष सारांश रुपाने येथे दिले असून त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

पालक प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक एक मध्ये पालकांच्या आपल्या पाल्याच्या अभ्यास विषयक कोणत्या कल्पना आहेत याची विचारणा केली असता पालकांनी आपल्या ज्या कल्पना नमूद केल्या आहेत. त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, "पास व्हावे, कसे तरी पास व्हावे, जमल्यास टक्केवारीने पास व्हावे, ८० टक्के गुण त्याने मिळवावेत" इत्यादी. पाल्याच्या अभ्यासा-विषयक अपेक्षा पालक बाळगून आहेत. आजच्या परिस्थितीत त्यांच्या या अपेक्षा रास्तच आहेत. तरीही अशी शिफारस करावीशी वाटते की, केवळ पास व्हावे, अधिक गुणाने पास व्हावे यापेक्षाही पाठ्यपुस्तकातील ज्ञान परीक्षांपुरतेच पाल्याने मर्यादित न ठेवता त्याच्या जीवनाला ते सदैव उपयुक्त ठरावे, तो संस्कारी बनावा अशा दृष्टीकोनातून पाल्याच्या अभ्यासाकडे त्याने पहावे. आपला पाल्य केवळ परीक्षार्थी बनू नये याची खबरदारी पालकाने घ्यावी.

सारणी क्रमांक ५.१० [पाठ्यपुस्तक, मार्गदर्शक आणि अभ्यास] वरुन असा निष्कर्ष निघतो की, दरवर्षी पाल्याला नवीन पुस्तके घेऊन –

देणाऱ्या पालकांची संख्या ८४ टक्के इतकी आहे. ही फारच समाधानाची बाब आहे. १६ टक्के इतके पालक गरीबीमुळे शाळेच्या ग्रंथालयातून पुस्तके मिळाल्यामुळे आणि थोरल्या भावंडाची जुनी पुस्तके वापरावयास असल्यामुळे नवीन पुस्तके घेऊन देत नाहीत. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, मुलांना शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याबरोबर इतर सर्व अडचणी बाजूला ठेवून पाठ्यपुस्तके घेऊन देण्यात यावीत. "शाळेच्या पहिल्याच दिवशी दप्तरात पुस्तके असणे" विद्यार्थ्यांच्या मनाला फारच सुखावह असते. तो अभ्यासासाठी दुसऱ्याच्या पाठ्यपुस्तकावर अवलंबून रहात नाही. अगदीच नाईलाज झाला तरच पाठ्यपुस्तके शाळेच्या ग्रंथालयातून, सेवाभावी संस्थाकडून घेण्याचा प्रयत्न व्हावा.

याच सारणी क्रमांक ५.१० वरून असाही निष्कर्ष निघतो की, इतिहास पाठ्यपुस्तक जिज्ञासा म्हणून पहाणाऱ्या पालकांची संख्या ४२ टक्के इतकी आहे, तर पाठ्यपुस्तक न पहाणाऱ्या पालकांची संख्या तुलनेने जास्त म्हणजे ५८ टक्के इतकी आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, जास्तीत जास्त पालक इयत्ता दहावीचे इतिहासाचेच नव्हे तर कोणतेच पाठ्यपुस्तक जिज्ञासा म्हणून पहात नाहीत. ही बाब खचितच असमाधानाची आहे. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटते की, पालकांनी आपला पाल्य ज्या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास करतो ती पाठ्यपुस्तके जिज्ञासेने आणि अभ्यासूवृत्तीने पहावीत. "वेळ नाही, आपल्याला त्यातले काही समजत नाही, शाळा जाणे आणि त्याचा अभ्यास जाणे" यासारख्या नेहमीच्या सबबी पुढे करून आपल्या कर्तव्यापासून पालकांनी पळ काढू नये. कारण पालक हा एक शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा क्रियाशील घटक आहे. जे पालक निरक्षर आहेत त्यांच्या बाबत हा प्रश्न उद्भवत नाही. मात्र सुशिक्षित पदवीधर पालकाकडून ही अपेक्षा केल्यास वावगी ठरत नाही. ते त्यांचे आद्य कर्तव्य आहे.

याच सारणी क्रमांक ५.१० [पाठ्यपुस्तक मार्गदर्शक आणि अभ्यास ] वरून असा निष्कर्ष निघतो की, पाल्याला पाठ्यपुस्तकातूनच अभ्यास करण्याचा आग्रह धरणाऱ्या पालकांची संख्या फक्त २० टक्के इतकी आहे. ही बाब चिंतेची आहे. याबाबत अशी शिफारस करावीशी वाटतेकी, पाठ्यपुस्तकातूनच अभ्यास करण्याचा आग्रह व तशी सवय पाल्याला पालकानी जाणीवपूर्वक लावावी. पाठ्यपुस्तकाचे महत्त्व त्याना पटवून देण्याची अध्यापका इतकीच पालकांचीही जबाबदारी आहे हे त्यानी विसरु नये.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शक अभ्यासाला उपयुक्त वाटण्याची पालकांनी जी कारणे दिली आहेत त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की,

[१] मार्गदर्शक म्हणजे "मागणी तसा पुरवठा".

[२] मार्गदर्शकात प्रश्नोत्तरे असतात.

[३] सगळीच मुले हुशार नसतात.

[४] मुलांना अभ्यासाचे कष्ट नको आहेत.

[५] मार्गदर्शकाची जाहीरात फार झाली आहे.

[६] शिक्षकच मार्गदर्शक वापरतात.

वरील निष्कर्षावरुन अशी शिफारस करावीशी वाटते की, विद्यार्थी मार्गदर्शक वापरण्यामागील वरील कारणे वास्तव असली तरी पालकांनी पाठ्यपुस्तकातूनच अभ्यास करण्याची सवय मुला मुलींना लावावी. जे आपल्या हाती आहे, आपल्या अधिकारात आहे ते करणे आपले आद्य कर्तव्य ठरते. "दुसरी मुले मार्गदर्शक वापरतात म्हणून आपल्या मुलाने तो वापरला तर कुठे बिघडते ? " ही भूमिका पालकांनी सोडून द्यावी. "पाठ्यपुस्तकातून अभ्यास" हे तत्व मुला मुलींना पालकांनी पटवून देवून अंमलात आणावे.

६.५ परीक्षा पध्दतीचे स्वरूप व मार्गदर्शकाचा वापर विषयक - निष्कर्ष व शिफारशी :-

"परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे" या विधानाबाबत सकारण विचारणा विद्यार्थी, अध्यापक व पालक प्रश्नावलीत केली होती. या विधानाबाबत विद्यार्थ्यांनी दिलेल्या मताच्या सारणी क्रमांक ५.२ [परीक्षा पध्दतीचे स्वरूप आणि मार्गदर्शकाचा वापर] वरून असा निष्कर्ष निघतो की, परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९३ टक्के इतकी आहे. तर अध्यापकांनी दिलेल्या मताच्या सारणी क्रमांक ५.९ वरून या विधानाला सहमती दर्शविणाऱ्या अध्यापकांची संख्या १०० टक्के असल्याचे दिसते, आणि याच विधाना - बाबतच्या सारणी क्रमांक ५.११ वरून या विधानाला सहमती दर्शविणाऱ्या पालकांची संख्या ८४ टक्के इतकी आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, परीक्षा पध्दतीचे स्वरूपच मार्गदर्शक वापरण्यास कारणीभूत ठरत आहे. या विधानाच्या खरेपणा बद्दल विद्यार्थी, अध्यापक व पालक यांनी जी कारणे दिली आहेत ती निष्कर्षवजाच असल्याने खाली दिली आहेत.

[१] जे जे परीक्षेत विचारले जाते ते ते सर्व मार्गदर्शकात असते.

[२] परीक्षेत वस्तुनिष्ठ, लघुत्तरी प्रश्नांचे प्रमाण जास्त असते.

[३] आजची शालांत परीक्षा ही बुध्दीमता जोखणारी परीक्षा नाही.

[४] पाठांतराला व स्मरणशक्तीला प्राधान्य देणारी ही परीक्षा आहे.

[५] विद्यार्थ्यांच्या क्रियाकौशल्याला परीक्षेत वाव नाही.

[६] "लेखी परीक्षा" हे या परीक्षेचे एकमेव वैशिष्ट्ये आहे. प्रात्यक्षिकाला त्यात वाव नाही.

आजच्या अध्ययन-अध्यापन पध्दती व परीक्षा पध्दती विषयक एका पालकानेजे मत दिले आहे ते यासंदर्भात निष्कर्षवजा असल्याने ते पुढे दिले आहे. "लेखी परीक्षा हा एकच प्रकार अवलंबिला जात असल्याने हे सर्व घडून येते. अजूनही आमच्या शाळेत – महाविद्यालयात शिक्षकांनी सांगावयाचे, मुलांनी ऐकावयाचे व लिहून घ्यावयाचे, त्यावर परीक्षेत प्रश्न विचारायचे, मुलांनी स्मरण करून त्याची उत्तरे लिहायची आणि पास होऊन विसरून जावयाचे."

वर वर्णन केलेल्या परंपरागत अध्ययन – अध्यापन पध्दती व परीक्षा पध्दती बाबत विद्यार्थी, अध्यापक व पालक यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या शिफारस वजाच असल्याने त्या पुढे दिल्या आहेत.

[१] प्रश्नपत्रिकेत वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्नांचे प्रमाण अल्प किंवा जवळ जवळ नसावे.

[२] दीर्घोत्तरी प्रश्न अधिक विचारावेत.

[३] दीर्घोत्तरी प्रश्नांचे स्वरूप विचाराला चालना देणारे असावे. पाठांतराला त्यात वाव नसावा.

[४] अभ्यासक्रमाविषयी अशा संबंधित ज्ञानाची परीक्षा होईल असे प्रश्न विचारावेत.

[५] परीक्षा पध्दती अशी आखा की तिथे मार्गदर्शिकाचा उपयोग करताच येणार नाही. परीक्षा पध्दती बदलली की, विद्यार्थी आपोआप बदलेल. 'Circumstance and the man will get changed' हा बावनकशी नियम लक्षात घ्यावा. माणूस कायद्याने किंवा व्याख्यानानी सुधारत नाही तर त्याच्या भोवतीची परिस्थिती बदलली की माणूस बदलतो.

[६] आज सर्व भर लेखी परीक्षेवर आहे. प्रात्यक्षिक जवळ जवळ नाहीच. ही परिस्थिती बरोबर उलटी करा. प्रात्यक्षिक परीक्षांवर भर आणि लेखी परीक्षा जवळ जवळ नाहीच.

[७] "झटपट विद्या" ही मनोवृत्ती विद्यार्थ्यांतून काढून टाकली जावी.

[८] साचेबंद प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलावे. Objective Method ऐवजी Subjective Method ची परीक्षा घ्यावी.

[९] परीक्षेत काय येईल याचा अंदाज, अनुमान विद्यार्थ्यांना करता येऊ नये, इतकी लवचिक प्रश्नपध्दती असावी.

[१०] प्रश्नपत्रिकेत नकाशा, आलेख, आकृती, घटना, प्रसंग यांचे रेखाटन, त्यासंबंधी प्रश्न असावेत. त्यामुळे संपादन कौशल्याची परीक्षा होईल.

विद्यार्थी, अध्यापक व पालक यानी परीक्षा पध्दतीचे स्वरूप कसे असावे याविषयी शिफारसवजा ज्या सूचना केलेल्या आहेत. त्या खचितच वस्तुस्थितीला धरून अशा अभ्यासू आहेत. त्यांचा विचार परीक्षेचे स्वरूप ठरवितांना अवश्य करावा अशी शिफारस करावीशी वाटते.

६.६ <u>पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा विषयक निष्कर्ष व शिफारशी :-</u>

इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तक लेखनातील उणीवा विद्यार्थी, अध्यापक व पालक यांच्याकडून समजून घेण्यासाठी विद्यार्थी प्रश्नावली, अध्यापक प्रश्नावली व पालक प्रश्नावलीत या संबंधीच्या प्रश्नांची विचारणा केली होती. त्याबाबत त्यानी दाखविलेल्या उणीवा वरून असा निष्कर्ष निघतो की –

[१] पाठ्यपुस्तकातील भाषा समजण्यास अवघड आहे.

[२] काही घटकांची माहिती अपुरी, त्रोटक व विस्कळीत स्वरूपाची आहे.

[३] पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम जास्त आहे.

[४] पाठ्यपुस्तकात घटकानुसार व प्रश्नप्रकारानुसार गुण विभागणी दिलेली नाही.

[५] महत्वाचे मुद्दे, शब्द, यांचा टाईप मोठा नाही.

[६] पाठ्यपुस्तकांत घटनांची जास्त रेलचेल झाली आहे.

[७] धड्याखालील प्रश्नात विविधता नाही.

पाठ्यपुस्तकातील वरील उणीवांच्या बाबतीत अशी शिफारस करावीशी वाटते की,

[१] पाठ्यपुस्तक लेखनातील भाषा सर्वांना सहज समजेल अशी सोपी असावी.

[२] पाठ्यपुस्तकातील घटनांची माहिती विस्तृतपणे द्यावी.
उदाहरणार्थ वुड्रो विल्सनचा १४ कलमी कार्यक्रम, १९३५ च्या सुधारणा कायद्यातील तरतुदी, प्रति सरकारचा १२ कलमी, व्दिदल राज्यपध्दती, या घटकांची माहिती विस्तृतपणे दिली जावी.

[३] इयत्ता दहावीच्या मुला-मुलींचा वयोगट विचारात घेता इतिहासाचा अभ्यासक्रम कमी हवा, स्वातंत्र्याचा लढा; गांधी युग ते स्वातंत्र्योत्तर भारत एवढाच अभ्यासक्रम हवा.

[४] पाठ्यपुस्तकाच्या प्रारंभी माध्यमिक शालांत परीक्षेची घटकानुसार व प्रश्नप्रकारानुसार गुण विभागणी द्यावी.

[५] धड्याच्या शेवटी सर्व प्रकारचे प्रश्न स्वाध्यायासाठी द्यावेत.

पाठ्यपुस्तकाचे लेखन अधिक निर्दोष, तंत्रशुध्द व उद्दिष्टानुरूप व्हावे यासाठी विद्यार्थी, अध्यापक व पालक यांनी केलेल्या सूचना

शिफारशीवजा आहेत. त्यातील निवडक व महत्वाच्या सुचना पुढील प्रमाणे –

[१] महत्वपूर्ण परिच्छेदाला जोडून आकर्षक, पुरेसी मोठी चित्रे हवीत.

[२] दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरासाठी मुद्देसूद, भरपूर माहिती हवी.

[३] भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास एकदाच अभ्यास क्रम हवा.

[४] पाठाच्या प्रारंभी पाठातील सारांश थोडक्यांत ठळक अक्षरात द्यावा.

[५] ऐतिहासिक घटना, व्यक्तिची कार्ये, राष्ट्रीय सभेची अधिवेशने इत्यादींचे तक्ते पाठ्यपुस्तकात हवेत.

[६] प्रसंगाची मांडणी आकर्ष हवी.

[७] पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ भारतीय स्वातंत्र्य लढयाशी संबंधित असे आकर्षक हवे.

[८] धडे लहान म्हणजे ५ ते ६ पानांचे असावेत.

[९] इतिहास, नागरिक शास्त्राचे एकच पुस्तक असावे.

विद्यार्थी, अध्यापक व पालक यानी इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखनाबाबत ज्या शिफारशीवजा सुचना केल्या आहेत. त्याचा पाठ्यपुस्तकाचे पुर्नलिखन करताना अवश्य विचार व्हावा अशी शिफारस करावीशी वाटते.

६.७ <u>मार्गदर्शक पाठ्यपुस्तक विषयक निष्कर्ष व शिफारशी</u> :-

इयत्ता दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकाचे स्वरूप "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" असे असावे काय ? याबाबत विद्यार्थी, अध्यापक व पालक याना प्रश्नावलीव्दारा विचारणा केली होती. याबाबत

विद्यार्थ्यांनी दिलेल्या मताच्या सारणी क्रमांक ५•२ वरुन असा निष्कर्ष निघतो की, पाठ्यपुस्तक हे "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" हवे असे म्हणणा-या विद्यार्थ्यांची संख्या ८० टक्के इतकी आहे• अध्यापकांनी याबाबत दिलेल्या मताच्या सारणी क्रमांक ५•९ वरुन असा निष्कर्ष निघतो की, पाठ्यपुस्तक हे "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" स्वरुपात हवे असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या १३ टक्के इतकी आहे• तर पालकांनी याबाबत दिलेल्या मताच्या सारणी क्रमांक ५•११ वरुन असा निष्कर्ष निघतो की, पाठ्यपुस्तक हे मार्गदर्शक पाठ्यपुस्तक स्वरुपात हवे असे म्हणणा-या पालकांची संख्या २६ टक्के इतकी आहे•

पाठ्यपुस्तकाचे स्वरुप "मार्गदर्शक पाठ्यपुस्तका" सारखे बहुसंख्य विद्यार्थ्यांना हवे आहे• मात्र अध्यापक व पालक यांना "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" ही कल्पना मान्य नसल्याचा निष्कर्ष वरील आकडेवारी वरुन निघतो• ही समाधानाची बाब आहे•

"प्रश्नांची उत्तरे विनासायास मिळणे, ती पाठ करुन परीक्षेत लिहीणे आणि पास होणे" ही विद्यार्थी मनाची धारणा "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" हवे म्हणण्याला कारणीभूत आहे• विद्यार्थी वयोगट, त्यांची जाण आणि परीक्षेविषयक त्यांचा दृष्टीकोन विचारात घेता त्यांची अपेक्षा गैर आहे असे म्हणता येत नाही• अध्यापक व पालक यांना "प्रश्नोत्तरे आणि पास होणे" या पुरते पाठ्यपुस्तकाचे महत्त्व मर्यादित नाही ही गोष्ट उमगली आहे• ही समाधानाची बाब आहे• विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही समाजवाद मनोवृत्ती निर्माण करणे, त्यांना जीवनाची मूल्ये आत्मसात करण्याची प्रेरणा देणे, त्यांची अस्मिता जागी करणे, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करणे आणि त्यांना सुजाण-

नागरिक बनविणे ह्या इतिहास शिक्षणाच्या नव्या दृष्टीकोनातून दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकाचे लेखन करण्यात आले आहे. याची जाण अध्यापक व पालक यांना आहे ही बाब समाधानाची आहे. म्हणून अशी शिफारस करावीशी वाटते की इतिहास पाठ्यपुस्तकाला दुसरा पोषक पर्याय म्हणून "मार्गदर्शक पाठ्यपुस्तक" होऊ शकत नाही पाठ्यपुस्तक हे पाठ्यपुस्तकच रहावे. मात्र आवश्यकतेनुसार त्याचे पुर्नलेखन करून त्यातील उणीवा कमी करण्याचा सतत प्रयत्न व्हावा.

६.८ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी :-

[१] इयत्ता ५ वी पासूनच मुलामुलींना पाठ्यपुस्तकातून अभ्यास करण्याची सवय अध्यापक व पालक यानी जाणीवपूर्वक लावणे गरजेचे आहे.

[२] पाठ्यपुस्तकातून अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वाचन स्पर्धा, अनुलेखन स्पर्धा व पाठांतर स्पर्धांचे आयोजन करावे

[३] आठवड्यातून एक तास वर्गात विषय शिक्षकाच्या उपस्थितीत "पाठ्यपुस्तकाचे मूक वाचन" उपक्रम राबवावा.

[४] माध्यमिक स्तरावर इतिहास विषयाचे अध्ययन-अध्यापन सकस होणे गरजेचे आहे.

[५] इतिहास अध्ययन-अध्यापनात पाठ्यपुस्तकाच्या वापरा विषयक परिसंवाद, चर्चासत्रे यांचे वेळोवेळी आयोजन करावे.

[६] गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकट मुलाखतीतून पाठ्यपुस्तकाचे महत्त्व मुलांच्या निदर्शनास आणून देण्याचा नियोजनबध्द प्रयत्न व्हावा.

[७] इतिहास अध्यापकाने इतिहास हस्तपुस्तिकेचा वापर अवश्य करावा.

[८] विशिष्ट घटकाचा अभ्यास विद्यार्थ्यांना करून यायला सांगून विद्यार्थ्यांत त्याबाबत आठवड्यातून एकदा चर्चा घडवून आणावी.

[९] इतिहास पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन-अध्यापनातील वापरा विषयक व्याख्यानमालेचे आयोजन करून अनुभवी अध्यापकांचा लाभ विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना मिळवून द्यावा.

[१०] इतिहास विषय शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग असावेत.

[११] विद्यार्थ्यांचे "इतिहास पाठ्यपुस्तक वाचन मंडळ" स्थापन करावे.

[१२] शाळेच्या वेळेत ग्रंथालयात फक्त पाठ्यपुस्तक वाचनाची स्वतंत्र सोय असावी.

[१३] अनुभवी प्रशिक्षित अध्यापकाकडेच "इतिहास" या विषयाचे अध्यापन असावे.

[१४] इतिहास विषयाचे विविध शालेय उपक्रम राबविणाऱ्या नामवंत शाळा व शिक्षक यांच्या सहकार्याने "संपर्काधिष्ठीत गुणवत्ता वाढीचा कार्यक्रम" राबवावा.

## ६.९ पुढील संशोधनासाठी काही विषय :-

प्रस्तुत प्रकरणाच्या आतापर्यंतच्या भागात या संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी सादर केल्या. हे संशोधन करत असताना संशोधकाला काही समस्या जाणविल्या. त्या समस्या प्रस्तुत संशोधनाविषयाशी प्रत्यक्ष संबंधित नसल्यामुळे संशोधकाने मुळापर्यंत जाऊन त्यांचा सखोल,

सांगोपांग, तपशीलवार परामर्श घेतला नाही. तथापि समस्यांचा असा अभ्यास केला गेल्यास तो प्रस्तुत समस्येच्या सर्वांगीण सम्यक् आकलनास उपकारकच ठरेल असे वाटल्यामुळे त्या समस्यांचा खालील परिच्छेदांमधून पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

[१] प्रस्तुत संशोधन हे कराड नगरपरिषदेच्या हद्दीतील माध्यमिक शाळापुरतेच मर्यादीत आहे. त्याऐवजी एका संपूर्ण जिल्ह्यातील माध्यमिक शाळा अभ्यासासाठी निवडल्या जाऊन हा अभ्यास अधिकाधिक निर्दोष व उपयुक्त कसा होईल याचा शोध घेतला जावा.

[२] माध्यमिक शाळांतील सर्व विषयांची पाठ्यपुस्तके व त्यांच्या मार्गदर्शिका यांचा अध्ययन अध्यापनातील वापरा विषयीचा विद्यार्थी, अध्यापक व पालक यांच्या दृष्टीकोनातून चिकित्सक अभ्यास केला जावा.

[३] इयत्ता दहावीची माध्यमिक शालांत परीक्षा ही विद्यार्थी जीवनातील पहिली सार्वजनिक व सार्वत्रिक परीक्षा आहे. या परीक्षेच्या अभ्यासासाठी पाठ्यपुस्तका बरोबरच मार्गदर्शक विद्यार्थी वापरतात, पण इयत्ता पाचवी पासूनच विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातूनच अभ्यास करावा यासाठी विद्यार्थी, अध्यापक, मुख्याध्यापक व पालक या पातळीवर सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. यासाठी कोणती उपाययोजना हाती घेतली पाहिजे, कोणते व्यावहारिक उपक्रम योजले पाहिजेत याविषयी संशोधनांती दिग्दर्शन होणे अगत्याचे वाटते.

[४] इतिहास विषयाच्या अध्ययन-अध्यापनात इतिहासाचे पाठ्यपुस्तक हे एक अनिवार्य असे महत्वाचे साधन आहे. इतिहास

विषयाच्या अध्यापनाची उद्दिष्टये, विद्यार्थ्यांची क्षमता, अभिरुची या गोष्टी लक्षात घेऊन ते तयार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि संशोधन मंडळा तर्फे ती तशी तयार करण्याचे प्रयत्न देखील होत आहेत. हे मान्य करूनही प्रचलित पाठ्यपुस्तकांचे वरील दृष्टीकोनातून पुनर्मूल्यांकन व्हावे आणि हे साधन अधिकाधिक निर्दोष व उपयुक्त कसे होईल याचा शोध घेतला जावा.

=-=-=-=-=-=